ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक ३११ • गुरुवार दि.१० सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेड दुष्काळग्रस्त जाहीर करा;दीड महिन्यापासून पावसाचा खंड

### आ.राजूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाची महसूल मंत्र्याकडे मागणी



नांदेड/प्रतिनिधी-पावसाने सलग दीड महिन्यापासून दडी मारल्याने नांदेड जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटाच्या छायेत आला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत सोयाबीन, तूर, कापूस आणि हळद या प्रमुख पिकांवर करपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून नांदेड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी भाजपा महानगराध्यक्ष तथा आ.अमरनाथ राजूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. त्यातच गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. मात्र, त्यानंतर दीर्घकाळ पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांना पाण्याची तीव्र गरज भासत आहे. सोयाबीन, तूर, कापूस आणि हळद यासह विविध खरीप पिकांवर या पावसाच्या खंडाचा गंभीर परिणाम झाला आहे. बहुतांश भागांत पिके सुकण्यास सुरुवात झाली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पेरणीपूर्व मशागत, बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे, मजुरी यासाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, आता पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने हा खर्चही भरून निघेल की नाही, याबाबत साशंकता आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या पान ४ वर

## नांदेडसह राज्यातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा अंदाज

मुंबई/प्रतिनिधी-येत्या दोन दिवसात नांदेडसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये कुठे मुसळधार तर कुठे हलका पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने आज व्यक्त केला आहे. कमी पावसामुळे दुष्काळाच्या छायेत असलेल्या नांदेडसह मराठवाडा आणि अनेक जिल्ह्यांना हवामान विभागाच्या नव्या अंदाजामुळे तुर्त दिलासा मिळत आहे.

एल-निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या मान्सूनमध्ये राज्यभर पावसाचे असमान चित्र पाहायला मिळत असून महाराष्ट्रातील ३६ पैकी तब्बल १९ जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट नोंदवण्यात आली आहे. ऑगस्टनंतर सप्टेंबरमध्येही अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून मराठवाडा आणि विदर्भातील खरीप पिकांवर पावसाअभावी संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या आसपास पाऊस झाला असून केवळ चार जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान नोंदवले गेले आहे. मात्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाची परिस्थिती चिंताजनक आहे. ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांच्या माहितीनुसार, बीड आणि सोलापूर जिल्ह्यांत पावसाची तूट सुमारे ४७ ते ४८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांना पुढील पावसाची नितांत गरज आहे. राज्यात १२ सप्टेंबरपासून पावसाचा जोर काही प्रमाणात वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. खान्देश, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. या काळात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. १३ सप्टेंबर रोजी राज्यातील पावसाचा विस्तार आणखी वाढण्याची शक्यता आहे. पालघर, पान ४ वर

## लंडनच्या संसदेत जय महाराष्ट्र; एकनाथ शिंदेंचा प्रतिष्ठेचा गौरव

लंडन:राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांना ब्रिटनच्या संसदेतील वरिष्ठ सभागृह हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरविण्यात आले. नागरिक-केंद्री, पारदर्शक आणि नाविन्यपूर्ण प्रशासनासाठी त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. यावेळी लंडनचे संसदेचे वरिष्ठ सभागृह हाऊस ऑफ लॉर्ड्स जय हिंद जय महाराष्ट्राच्या घोषणांनी दणाणले.

पुरस्कार स्वीकारताना शिंदे यांनी नमस्कार, जय हिंद, जय महाराष्ट्र अशी मराठीतून भाषणाची सुरुवात केली. कवी सुरेश भट यांच्या लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी या ओळी उद्धृत करत त्यांनी



महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची ओळख ब्रिटनच्या संसदेत मांडली.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, शासन आपल्या दारी, मुलींच्या उच्च शिक्षणासाठी मदत, दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग आणि वैद्यकीय सहाय्यता अशा योजनांचा त्यांनी उल्लेख केला. आई आणि पत्नीच्या कष्टांतून सर्वसामान्यांसाठी काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या विकासाचा वेग अधोरेखित करत त्यांनी २०३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याचे लक्ष्य सांगितले. फिनटेक, ग्रीन एनर्जी, ग्रीन हायड्रोजन, डीप-टेक आणि कौशल्य विकास क्षेत्रात ब्रिटनसोबत सहकार्याची मोठी संधी असल्याचे सांगत त्यांनी ब्रिटिश उद्योगांना महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले. हा पुरस्कार महाराष्ट्रातील जनतेच्या कष्टांचा गौरव असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

## मराठा मोर्चा मुंबईत धडकणारच,आता सुटी नाही-जरांगे पाटलांचा इशारा

### भाऊ मैदानात असताना जेवायला बोलवू नका; अमृता फडणवीसांच्या निमंत्रणावर जरांगेंचा टोला

जालना:मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत मोर्चा धडकणारच असल्याचा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा व्यक्त केला. येत्या १२ सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथे मराठा बांधवांची बैठक होणार असून, या बैठकीत मुंबईकडे कधी कूच करायची, याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राज्यातील वातावरण तापले असताना मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा गुरुवारी तेरावा दिवस आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी जरांगे पाटील यांना भाऊ म्हणत घरी जेवणाचे निमंत्रण दिले होते. या निमंत्रणावर जरांगे पाटील यांनी गुरुवारी अंतरवाली सराटी येथून प्रतिक्रिया देताना, आंदोलनाच्या काळात जेवणाचे निमंत्रण देऊ नये, असे सांगत सूचक टोला लगावला. जरांगे पाटील म्हणाले, ताईंनी सांगितले आहे ना, मग जेवायला जाऊ. पण भाऊबीजेच्या वेळी बोलवा. आता आंदोलन सुरू आहे. भाऊ मैदानात असताना बोलवू नये. भाऊ संकटात जातो. बहिणीने तेवढा तरी बारकाईने आमचा विचार करावा. आज जेवायला बोलवू नये. आमच्या बहिणींनी आम्हाला भाऊबीजेला बोलवावे. आम्ही साडी-चोळी घेऊन जाऊ, हा मनोज जरांगेंचा शब्द आहे.मात्र आज लढण्याच्या मैदानातून जेवायला या, असे सांगितले तर मला हार पत्करावी लागेल. ताईंनी ही मायेची भावना आमच्या बाजूने ठेवावी, असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मराठा आंदोलकांवर दाखल होत असलेल्या गुन्ह्यांवरही जरांगे यांनी सरकारवर निशाणा साधला. समाजाला हे सहन करावे लागणार आहे. आपले आपल्याला मिळत नाही. पान ४ वर

## अबू सालेमला ‘सर्वोच्च’दणका; सुटकेची याचिका फेटाळली

नवी दिल्ली: बॉम्ब स्फोट प्रकरणात अटकेत असलेल्या कुख्यात गुंड अबू सालेमच्या मुदतपूर्व सुटकेची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्या.संदीप मेहता यांच्या खंडपीठाने फेटाळून लावली आहे.



मुंबईतील १९९३ च्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने अबू सालेमला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. या प्रकरणी अबू सालेमच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात मुदतपूर्व सुटकेची मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. यावर आज सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देत ही याचिका फेटाळून लावली आहे. खटला सुरू असतानाचा तुरुंगवास आणि चांगल्या वर्तणुकीबद्दल मिळालेली शिक्षामाफी २५ वर्षांच्या शिक्षेत समाविष्ट करावी, अशी मागणी सालेमने केली होती. भारताने पोर्तुगालला दिलेल्या प्रत्यार्पणाच्या आश्वासनानुसार त्याला २५ वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात ठेवता येणार नाही, असा दावा त्याने केला होता.मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला. सालेमला ११ नोव्हेंबर २००५ रोजी भारतात अटक झाली असून, प्रत्यार्पणाच्या अटींनुसार २५ वर्षांचा कालावधी नोव्हेंबर ३०३०मध्ये पूर्ण होणार आहे. त्यामुळे त्याची मुदतपूर्व सुटका करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

## मध्यरात्री रेती तस्करांचा पाठलाग;चिखलात रुतला ट्रॅक्टर!

### महसूल पथकाची धडक कारवाई,चालकाने धावत्या ट्रॅक्टरमधून पळ काढला

माहूर/प्रतिनिधी-अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती वाहतुकीला आळा घालण्यासाठी माहूर तहसील कार्यालयाच्या गौण खनिज पथकाने मध्यरात्री धडक कारवाई केली. दि.९ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास कर्तारसिंग तांडा परिसरात गस्त घालत असताना धानोरा येथून अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर पथकाच्या निदर्शनास आले. पथकाने ट्रॅक्टरचा पाठलाग सुरू करताच चालकाने कर्तारसिंग तांडा परिसरात धावत्या ट्रॅक्टरमधील अंदाजे एक ब्रास रेती खाली केली आणि ट्रॅक्टरसह धानोरा येथील शेत रस्त्याने पळ काढला.

महसूल पथकाने पाठलाग सुरूच ठेवला. अखेर पैनगंगा नदीपात्राजवळ ट्रॅक्टरला पकडण्यात पथकाला यश आले. मात्र, कारवाईदरम्यान ट्रॅक्टर नदीपात्रातील चिखलात पूर्णपणे रुतल्याने महसूल पथकासमोर नवे संकट उभे राहिले. ट्रॅक्टर बाहेर काढण्यासाठी मोठे प्रयत्न करण्यात आले. दुसऱ्या ट्रॅक्टरच्या सहाय्यानेही बाहेर काढण्याचा प्रयत्न झाला; मात्र चिखलात खोलवर रुतलेला ट्रॅक्टर बाहेर काढणे शक्य झाले नाही. अखेर पहाटे सुमारे ६ वाजता घटनास्थळीच मुद्देमालाचा पंचनामा करण्यात आला.जप्त केलेले ट्रॅक्टर पुढील कारवाईसाठी मोहपूरचे पोलिस पाटील



प्रदीप सोनटक्के यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अवैध रेती वाहतुकीविरोधातील या कारवाईमुळे रेती तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.ही कारवाई तहसीलदार अभिजित जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पान ४ वर

## वसरणी येथील कुंटणखान्यावर पोलिसांची धाड

### दोन महिलांची सुटका;चार जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील वसरणी भागात एका इमारतीमध्ये सुरु असलेल्या कुंटणखान्यावर बुधवारी इतवारा उपविभागाचे पोलिस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने धाड टाकुन दोन महिलांची सुटका केली. या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

वसरणी येथे एका इमारतीमध्ये वेश्या व्यवसाय (कुंटणखाना) सुरु असल्याची माहिती पोलिस उपअधिक्षक प्रशांत शिंदे यांना मिळाली. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष



विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे संयुक्त पथक स्थापन करुन पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी एक बनावट ग्राहक तयार करुन त्याच्याजवळ रोख रक्कम दिली. बनावट ग्राहकास एका महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधण्यास सांगितले. संबंधित ग्राहकाने महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधला असता तेव्हा महिलेने ग्राहकाला लातुरफाटा येथे येण्यास सांगितले. त्यानंतर बनावट ग्राहक, पंच व पोलिस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वातील पोलिस पथकाने बुधवारी वसरणी येथील एका पांढऱ्या रंगाच्या इमारतीवर धाड टाकली. यावेळी इमारतीमध्ये कुंटणखाना सुरु असल्याचे आढळून आले. पोलिसांनी नांदेड व गुजरात मधील दोन महिलांची सुटका करुन कुंटणखाना चालविणाऱ्या पान ४ वर

## निचपूर ग्राम पंचायतमधील वाद चव्हाट्यावर

### बिलासाठी हुज्जत ते मारण्याची धमकी;ग्रा.पं.अधिकाऱ्याची पोलिसांत तक्रार

किनवट/प्रतिनिधी-निचपूर गावात केलेल्या विकास कामांच्या बिलावरुन गुत्तेदार आणि ग्राम पंचायत अधिकारी यांच्यातील वाद विकोपाला जाऊन चक्क किनवट पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला. ग्राम पंचायत अधिकारी विनायक देवराव आडे यांनी संजय गणपत मुंडे, व्यंकट उकंडराव डोईफोडे आणि शंकर प्रकाश अंकुरवाड या तिघांविरुद्ध ९ सप्टेंबर रोजी तक्रार दाखल केली आहे.

विकास कामासाठी निधी उपलब्ध असेल आणि वेळेवर बिल मिळाले नसेल तर देयके अदा करण्यात कुठे माशी शिंकली याचाही संबंधित विभागाने छडा लावणे गरजेचे आहे, कारण प्रश्न आहे तो गावच्या विकासाचा अशाही लोकभावना ऐकायला मिळताहेत. ग्राम पंचायत अधिकारी विनायक आडे ग्राम पंचायत तोटंबा येथे कार्यरत असताना निचपूर ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्यावर सोपवला आहे. निचपूर गावात केलेल्या विकास कामांच्या बिलावरुन संजय मुंडे यांनी ७ सप्टेंबर रोजी फोनवरून मारण्याची धमकी दिली. तर ९ सप्टेंबर रोजी दुपारी किनवट पंचायत समितीच्या प्रांगणात व्यंकट डोईफोडे यांनी बिलाबद्दल हुज्जत घातली आणि त्याच दरम्यान ग्राम पंचायतीचे सदस्य शंकर अंकुरवाड हे मारण्याच्या उद्देशाने ग्राम पंचायत अधिकारी आडे यांच्या अंगावर धावून आले. दरम्यान नेमके उपस्थित असलेले निचपूर येथील नारायण दराडे, शंकर राठोड आणि ग्राम पंचायतीचे सेवक छगन हापसे यांच्या मध्यस्थीमुळे पुढील प्रसंग टळला असल्याचे तक्रारीत नमूद आहे. गावच्या विकासासाठी ग्राम पंचायत अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचा समन्वय महत्वाचा असतो. केलेल्या कामाचे दाम मागण्यावरुन अशा घटना घडणे निश्चितच संयुक्तिक वाटत नाहीत. निधी उपलब्ध असेल तर कामाच्या देण्यासाठी विलंब होऊ नये ही माफक अपेक्षा असते. पुढे काय होणार ते पहायला मिळणार आहे.

# परीक्षेच्या घाण्यात भविष्य!

आज बैलपोळा. बळीराजाच्या जीवनाशी नाळ जोडलेल्या आणि शेतकऱ्याच्या कष्टाचा साथीदार असलेल्या बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. वर्षभर शेतकऱ्याच्या शेतात राबणाऱ्या बैलाला आज सजवले जाते, त्याची पूजा केली जाते. मात्र या सणाच्या निमित्ताने एक वेगळीच उपमा डोळ्यासमोर उभी राहते. घाण्याला जुंपलेल्या बैलाला फक्त गोल गोल फिरणे माहीत असते. दिशा बदलत नाही, पुढे जात नाही; तो त्याच वर्तुळात फिरत राहतो. दुर्दैवाने आज देशातील तरुणाईची अवस्था काहीशी अशीच झाली आहे.शिक्षण घ्यायचे, पदवी मिळवायची, स्पर्धा परीक्षेची तयारी करायची, परीक्षा द्यायची, निकालाची वाट पाहायची, पुन्हा पुढच्या परीक्षेची तयारी करायची...आणि पुन्हा त्याच चक्रात अडकायचे. परीक्षेभोवती तरुणाई गोल गोल फिरत आहे; पण तिच्या आयुष्याची गाडी मात्र पुढे सरकत नाही. ही केवळ उपमा नाही; ही आजच्या तरुणांच्या वास्तवाची वेदनादायी कहाणी आहे.देशाची सर्वात मोठी ताकद तरुणाई असल्याचे आपण अभिमानाने सांगतो. महाराष्ट्र प्रगत राज्य असल्याचा दावा केला जातो. ज्ञान, कौशल्य आणि मनुष्यबळ ही आपली ताकद असल्याचे सांगितले जाते. मग या सगळ्या दाव्यांच्या मध्यभागी उभ्या असलेल्या तरुणाला एक साधा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर काय असेल, ''शिक्षण घेतलं,आता नोकरी कुठे?'' हा प्रश्न आज लाखो तरुणांच्या मनात आहे. मुलाला इंजिनिअर करायचे म्हणून पालकांनी कर्ज काढले. महाविद्यालयाची फी भरली. हॉस्टेल, पुस्तके, प्रवास, कोचिंग यासाठी पैसा खर्च केला. चार वर्षे शिक्षण पूर्ण झाले. हातात पदवी आली. पण पदवीसोबत रोजगार आला नाही. उलट नोकरीच्या बाजारात आणखी एक कठीण स्पर्धा उभी राहिली. शिक्षणाचा खर्च पालकांनी करायचा आणि बेरोजगारीची किंमत तरुणांनी मोजायची, ही व्यवस्था नेमकी कुणासाठी आहे? सरकारी नोकरीचा मार्ग तर आणखी खडतर. एखाद्या परीक्षेच्या काही हजार जागांसाठी लाखो अर्ज येतात. तरुण वर्षानुवर्षे तयारी करतात. वयाची महत्त्वाची वर्षे स्पर्धा परीक्षांच्या प्रतीक्षेत जातात. परीक्षा कधी पुढे ढकलली जाते, कधी निकाल रखडतो, कधी भरती प्रक्रिया न्यायालयीन वादात अडकते, तर कधी पेपरफुटीच्या आरोपांनी संपूर्ण प्रक्रियेवरील विश्वासच उडतो. पेपरफुटी ही केवळ परीक्षा रद्द होण्याची घटना नाही. ती एका तरुणाच्या आयुष्यातील एक-दोन वर्षे हिरावून घेणारी व्यवस्था आहे. त्याच्या पालकांचा खर्च, त्याची मानसिक घुसमट आणि वय वाढल्याने कमी होणाऱ्या संधी याची भरपाई कोण करणार? आजची चिंताजनक बाब अशी की, तरुणाईच्या ऊर्जेला उत्पादन, संशोधन, उद्योग, शेती, तंत्रज्ञान आणि रोजगार निर्मितीच्या दिशेने वळवण्याऐवजी तिचा मोठा हिस्सा परीक्षांच्या चक्रात अडकून पडला आहे. परीक्षा हे रोजगार मिळवण्याचे साधन असायला हवे; त्या स्वतःच तरुणांच्या आयुष्याचे अंतिम ध्येय बनणे ही व्यवस्थेची शोकांतिका आहे. एक परीक्षा संपली की दुसरी परीक्षा. एक निकाल लागला की दुसऱ्या भरतीची प्रतीक्षा. एका जाहिरातीमागे हजारो उमेदवार. या सगळ्या चक्रात तरुणाचे वय, पैसा, वेळ आणि मानसिक ऊर्जा खर्च होत आहे.मग प्रश्न असा आहे, तरुणांच्या हातात भविष्य देण्यासाठी आपण परीक्षा घेतोय की त्यांचे भविष्यच परीक्षेच्या भोवऱ्यात अडकवतोय? सरकारने आता केवळ रोजगार मेळावे घेऊन किंवा हजारो रोजगार उपलब्ध करून दिल्याच्या घोषणा करून थांबू नये. प्रत्येक जिल्ह्यात किती तरुण पदवीधर झाले, त्यापैकी किती जणांना रोजगार मिळाला, किती जण त्यांच्या पात्रतेपेक्षा कमी दर्जाची नोकरी करत आहेत आणि किती जण बेरोजगार आहेत; याचा अधिकृत आणि पारदर्शक जिल्हानिहाय रोजगार अहवाल प्रसिद्ध झाला पाहिजे.सरकारी भरतीसाठीही काही मूलभूत नियम निश्चित करणे गरजेचे आहे. रिक्त पदांची वार्षिक गणना, भरतीचे निश्चित वेळापत्रक, परीक्षेपासून नियुक्तीपर्यंतची कमाल कालमर्यादा आणि पेपरफुटीसारख्या घटनांमध्ये दोषींवर कठोर कारवाई, हे कागदावर नव्हे तर प्रत्यक्षात दिसले पाहिजे. तरुणांना मोफत सल्ले नकोत. ''कौशल्य विकसित करा'', ''स्वयंरोजगार करा'', ''स्टार्टअप करा'' हे सांगणे सोपे आहे. पण प्रत्येक तरुण उद्योजक होऊ शकत नाही. प्रत्येकाकडे भांडवल नसते. प्रत्येकाला व्यवसायाचा धोका पत्करता येत नाही. देशाला उद्योजकही हवेत आणि सक्षम कर्मचारीही. म्हणून रोजगाराचा प्रश्न घोषणांमधून बाहेर काढून धोरणाच्या केंद्रस्थानी आणण्याची वेळ आली आहे. आज बैलपोळ्याच्या दिवशी बळीराजाच्या कष्टाच्या साथीदाराची पूजा करताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. बैलाला घाण्याभोवती गोल गोल फिरवत राहणे आणि त्याला पुढे जाण्याची संधी न देणे ही जशी शोषणाची व्यवस्था आहे, तशीच तरुणाईला वर्षानुवर्षे परीक्षांच्या चक्रात फिरवत ठेवणे हीदेखील सामाजिक शोकांतिका आहे.बैलाला शेतीत राबवून त्याच्या श्रमाचे फळ मिळते; पण तरुणाला वर्षानुवर्षे अभ्यास, परीक्षा आणि प्रतीक्षेत राबवूनही जर रोजगार मिळत नसेल, तर त्या व्यवस्थेने स्वतःला आरशात पाहण्याची वेळ आली आहे. तरुणांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. शिक्षण महाग, परीक्षा अनिश्चित, भरती रखडलेली आणि रोजगार असुरक्षित; या चारही गोष्टी एकत्र आल्या तर विकासाच्या चमकदार आकडेवारीला काही अर्थ उरत नाही. देशाच्या तरुणाईला भाषणात ''भविष्य'' म्हणण्यापेक्षा त्यांच्या हातात पदवीसोबत रोजगार, कौशल्यासोबत संधी आणि मेहनतीसोबत न्याय देणे आवश्यक आहे.नाहीतर उद्याचा प्रश्न अधिक कठोर असेल.

# पोळ्यावर महागाईची मारबत



अंकुश शिंगाडे
नागपूर.

आज पोळा. शेतकऱ्यांच्या आनंदाचा दिवस. शेतकऱ्यांचाच नाही तर बैलांच्याही आनंदाचा दिवस. त्यानिमीत्ताने लोक बैलाची पुजा करतात. त्याला एक दिवस का होईना आराम देतात. आदल्या दिवशी खोर भरो, कोटा वाढो म्हणतात.तर बैलाचे खांदे शेकतांना आज आवतन घे,उद्या जेवायला ये म्हणतात.

आज जसे बैलं पुजतात,तसेच बैल उद्याही पुजले जातील, कालही पुजत होते.पण आज बैलाची संख्या कमी झाली आहे. त्या बैलाची जागा न परवडणारा ट्रँक्टर घेवू पाहात आहे. पण महत्वाचे म्हणजे जी कामे बैलं करु शकतात. ती कामे ट्रँक्टर करु शकत नाही. काल जेव्हा बैलपोळा साजरा व्हायचा. तेव्हा शेतकरी या बैलासाठी खास बोरुच्या तागाचे दोर बनवायचे. चौऱ्या मटाटेही याच तागाचे बनवायचे. त्या तागाला रंग द्यायचे. गेरुचा रंग बनवायचे. तसेच चिक्कीनं बेगड लावायचे. मात्र बैलाला वेदना देत त्याची शिंग तासत नसत.

आज मात्र या बैलाला ऐन बैलपोळ्याच्या दिवशी त्रास दिला जातो. आज बैलाची शिंगे तासली जातात. त्या शिंगाला जास्त शिलल्याने कधीकधी बैलाला रक्त लागतं. तिथं जखम होते. ती जखम पुढं एवढी चिघळते की त्यात बैलाला मृत्यूही संभवतो.शिंग तासणे ही एक पद्धत जरी वाईट असली तरी आज प्रत्येक शेतकरी बैलाची शिंग तासतात. नव्हे तर जास्तीतजास्त पैसे मिळावे म्हणून बैलाला पोळा फुटल्यावर धावत धावत घरी नेल्यासाठी पराण्या टोचतात.मारताताही.तेव्हा विचार येतो की हाच का बैलपोळा! बैलाच्या आनंदाचा क्षण की दुःखाचा क्षण! जिथे बैलाला पुरणपोळी पुरविण्याऐवजी त्या बैलाचा आधार घेवून पैसे कमविण्याचा गोरखधंदा आज सुरु आहे.नव्हे तर या बैलाला घरोघरी फिरवून आलेल्या पैशातून जुव्वा खेळून दारु पिवून झिंगत पडणारे महाभाग आज आहेत.

बैलपोळ्याला जसा बैलाला त्रास होतो,तसाच त्रास त्या झाडांनाही होतो.या दिवशी शेकडो पळसाच्या झाडाची हत्या केली जाते.मेढ्या म्हणून लावतांना शेकडो पळसाची झाडे गारद होतात व पर्यावरण संतुलन बिघडते. नव्हे तर दुस-या दिवशी श्रावण महिना संपला म्हणून बकरा कोंबडा यासारख्या प्राण्यांचीही हत्या केली जाते.बकराबाजारात आजही रक्ताचे पाट वाहतील अशी स्थिती असते.एवढी भयानक वास्तवता. खरंच बैलपोळा बैलाच्याही आनंदाचा नाही.प्राणीमात्राच्याही आनंदाचा नाही तसेच वृक्षांच्याही आनंदाचा नाही असे वाटायला लागते.

आज मात्र या बैलपोळ्याने महागाईची जागा घेतलेली आहे.काल खास शेतकरीवर्ग बैलासाठी बोरुच्या तागाचे दोर विणत होता. आज तो दोर विणतांना दिसत नाही. काल बेगडावर काम भागवत होता.आज मात्र शिंगांना पेंट केला जातो. काल नाला ठोकत नव्हते.आज बैलाला नाल ठोकली जाते.बैलाला सजविण्यात येणारे रंग,चौऱ्या मटाटे, बाशिंग अति महाग झाले असून शेतकरी वर्गाला परवडणारी गोष्ट नाही.आताच्या शेतकऱ्यांसमोर आजच्या दिवसाची सांज कशी भागवायची असा विचार असतो.त्यातच आजचा शेतकरी आत्महत्या ही करतो अशावेळी बैलपोळा साजरा करतांना महागाई जर असा नाच दाखवत असेल तर शेतक-याने बैलपोळा हा सण कसा साजरा करावा.

बाजारात महागाईने उसळी घ्यावी.त्या गोष्टीला मनाई नाही. पण निदान बैलासाठी तरी या महागाईने उसळी घेवू नये. जेणेकरून उद्या हा बैलपोळाच सण बंद करावा लागेल. तसेच आपणही बैलपोळ्याच्या निमित्ताने बैलाची काळजी घ्यावी.निदान त्यांना या दिवशी तरी मारु नये. दारोदारी फिरवावे. बैलालाही पुरणपोळी खायला घालावी. पण याचा अर्थ पाहिजे तेवढीच.त्याचा त्रास बैलाला होणार नाही.याची काळजी आपण घेतलेली बरी. पोळ्यावर महागाईची मारबत येवू देवू नये. जरी दुकानातल्या वस्तू महाग झाल्या असतील, तरी शेतकऱ्याने पुर्वीसारखे आज बोरुपासून ताग काढावा.दोरखंड बनवावे.नव्हे तर त्या तागापासूनच चौरं व मटाट्या बनवाव्या. जेणेकरून बौलपोळा साजरा करतांना महागाईची ही मारबत त्रास देणार नाही.

# एक संवाद,एक आधार;जीवनाला जगण्याची नवी आशा



डॉ.राजेंद्र बगाटे

दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन म्हणून पाळला जातो. मानवी जीवनाचे अमूल्यत्व अधोरेखित करणारा आणि संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या पाठीशी संवेदनशीलतेने उभे राहण्याचा संदेश देणारा हा दिवस आहे. आत्महत्या हा केवळ एका व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित प्रश्न नाही; तो कुटुंब, समाज, आरोग्यव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि एकूणच मानवी नातेसंबंधांशी जोडलेला गंभीर सामाजिक व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील तीव्र मानसिक वेदना, एकाकीपणा, कौटुंबिक संघर्ष, आर्थिक अडचणी, शैक्षणिक किंवा व्यावसायिक ताण, नातेसंबंधांतील तणाव, सामाजिक अपमान, आजारपण किंवा भविष्याबद्दल निर्माण झालेली निराशा अशा अनेक कारणांचा एकत्रित परिणाम तिच्या मानसिक अवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्येकडे केवळ कमजोरी, भ्याडपणा किंवा चुकीचा निर्णय म्हणून पाहणे हा समस्येचा अतिशय संकुचित दृष्टिकोन ठरतो. या समस्येकडे मानवी वेदना, मानसिक आरोग्य आणि सामाजिक परिस्थिती या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक आहे.

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची सुरुवात २००३ मध्ये इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सुसाइड प्रिव्हेन्शन आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने झाली. आत्महत्या रोखण्यासाठी जागतिक स्तरावर जागरूकता निर्माण करणे, या विषयाभोवती असलेला सामाजिक कलंक कमी करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांना व्यापक स्वरूप देणे हा या दिवसाचा मुख्य हेतू आहे. २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी आत्महत्येविषयीचा दृष्टिकोन बदलूया ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली असून, २०२६ हे या त्रैवार्षिक अभियानाचे अंतिम वर्ष आहे. या अभियानाचा मूलभूत संदेश असा आहे की आत्महत्येविषयी मौन आणि गैरसमज यांना दूर करून खुलेपणाने, संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने संवाद साधला पाहिजे. संकटातील व्यक्तीला ऐकून घेणे, तिच्या भावनांचा आदर करणे, तिच्यावर दोषारोप न करणे आणि योग्य वेळी मदतीशी जोडणे हा प्रतिबंधाचा महत्त्वाचा मार्ग आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगभरात दरवर्षी सात लाखांहून अधिक लोक आत्महत्येमुळे मृत्युमुखी पडतात. ही संख्या केवळ आकडेवारी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक संख्येमागे एक व्यक्ती, एक कुटुंब, अनेक नाती आणि अनेक अपूर्ण स्वप्ने असतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचा परिणाम तिच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; पालक, मुले, भाऊ-बहीण, मित्र, सहकारी आणि संपूर्ण समुदायावर त्याची भावनिक छाया पडते. म्हणून आत्महत्या प्रतिबंधाकडे केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्याच्या दृष्टीने पाहण्याऐवजी संकट निर्माण होण्यापूर्वीच व्यक्तीला आधार मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. मानसिक आरोग्यसेवा सुलभ करणे, सामाजिक एकाकीपणा कमी करणे, कुटुंबातील संवाद वाढविणे आणि संकटातील व्यक्तीला मदत मागण्यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रतिबंधाची मूलभूत पावले आहेत.

मानसिक आरोग्याबाबत आपल्या समाजातील दृष्टिकोन बदलण्याची आज सर्वाधिक गरज आहे. शरीराला आजार झाला तर आपण डॉक्टरांकडे जातो, औषधोपचार घेतो आणि विश्रांती घेतो; परंतु मनावर ताण आला, नैराश्य जाणवले किंवा सतत अस्वस्थता निर्माण झाली तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसून येते. हे मनाचेच आहे, थोडे सकारात्मक विचार कर, स्वतःला सावर किंवा तुझ्याकडे तर सर्व काही आहे अशा वाक्यांनी मानसिक वेदना दूर होत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची संकटे वेगळी असतात आणि त्यांचा तिच्यावर होणारा परिणामही वेगळा असतो. म्हणून दुसऱ्याच्या दुःखाची तुलना आपल्या अनुभवांशी करणे टाळले पाहिजे. मानसिक त्रास हा व्यक्तीच्या चारित्र्याचा दोष नसून आरोग्याशी संबंधित एक गंभीर बाब आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे. आत्महत्या प्रतिबंधाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे संवाद. अनेकदा एखादी व्यक्ती संकटात असताना थेट मदत मागत नाही. तिच्या वर्तनात बदल होऊ शकतो, ती अधिक एकाकी राहू शकते, सतत निराश किंवा अस्वस्थ दिसू शकते किंवा पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींपासून दूर जाऊ शकते. अशा वेळी काय झाले? एवढे विचारून थांबण्याऐवजी तुला काही त्रास होत आहे का?, तुला माझ्याशी बोलायचे असेल तर मी ऐकण्यासाठी आहे असा विश्वास देणे आवश्यक आहे. संवाद साधताना समोरच्या व्यक्तीचे बोलणे मध्येच तोडणे, दोष देणे किंवा लगेच उपदेश करणे टाळले पाहिजे. काही वेळा व्यक्तीला उपायापेक्षा प्रथम कोणीतरी आपले म्हणणे मनापासून ऐकावे अशी गरज असते. ऐकून घेणे ही साधी कृती असली तरी तिचे भावनिक महत्त्व मोठे असते. कुटुंबाच्या भूमिकेला या संदर्भात विशेष महत्त्व आहे. कुटुंब व्यक्तीला भावनिक सुरक्षितता देणारे पहिले वर्तुळ असते. मात्र आधुनिक जीवनशैली, कामाचा वाढता ताण, स्थलांतर, डिजिटल माध्यमांचा अतिरेक आणि बदलती कौटुंबिक रचना यामुळे घरात राहूनही भावनिक अंतर वाढताना दिसते. एकाच घरात राहणारे सदस्य एकमेकांशी बोलण्यासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. पालकांना मुलांच्या अभ्यासाची, नोकरीची आणि भवितव्याची चिंता असते; पण मुलांच्या मनातील भीती, असुरक्षितता, अपयशाची भावना किंवा भावनिक संघर्ष समजून घेण्यासाठी आवश्यक संवाद कमी पडतो. मुलांच्या यशापेक्षा त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तुला नेहमी पहिलाच क्रमांक मिळाला पाहिजे यापेक्षा काहीही झाले तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत हा संदेश त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो. विद्यार्थी आणि तरुण हे विशेष संवेदनशील वयोगट आहेत. शिक्षणातील तीव्र स्पर्धा, परीक्षेतील अपेक्षा, प्रवेशाच्या संधी, करिअरची अनिश्चितता, बेरोजगारी, पालकांचा दबाव, मैत्री किंवा प्रेमसंबंधांतील तणाव आणि सामाजिक माध्यमांवरील तुलना यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा अनुभव घेतात. आज यशाची व्याख्या अनेकदा गुण, पद, पगार आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडली जाते. त्यामुळे अपयश आले की काही तरुणांना स्वतःचे मूल्य कमी झाल्यासारखे वाटू शकते. शिक्षणव्यवस्थेने ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अपयश हा जीवनाचा एक अनुभव आहे, अंतिम निर्णय नाही, हे समजावून सांगितले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशन, भावनिक शिक्षण, जीवनकौशल्ये आणि तणाव व्यवस्थापन यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. सामाजिक माध्यमांच्या युगात मानसिक आरोग्याचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. इतरांच्या जीवनातील यश, आनंद, प्रवास, आर्थिक संपन्नता आणि सामाजिक प्रतिष्ठेची चित्रे सतत पाहताना व्यक्ती नकळत स्वतःची तुलना इतरांशी करू शकते. मात्र सामाजिक माध्यमांवर दिसणारे जीवन हे संपूर्ण वास्तव नसते. प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतात, अपयश असते, चिंता असते आणि काही न सांगितलेल्या वेदनाही असतात. त्यामुळे आभासी जगातील प्रतिमांशी आपल्या वास्तवाची तुलना करणे टाळले पाहिजे. डिजिटल साधनांचा विवेकी वापर, प्रत्यक्ष नात्यांना दिलेला वेळ आणि स्वतःच्या भावनांकडे लक्ष देण्याची सवय मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधाचा प्रश्न तरुणांपुरताच मर्यादित नाही. आर्थिक संकटात सापडलेले कुटुंब, बेरोजगार युवक, व्यवसायात नुकसान झालेल्या व्यक्ती, शेतकरी आणि कामगार, गंभीर आजाराशी सामना करणारे नागरिक, कौटुंबिक हिंसाचार किंवा सामाजिक भेदभावाचा अनुभव घेणारे लोक आणि एकाकीपणाने त्रस्त वृद्ध या सर्व घटकांच्या मानसिक आरोग्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विशेषतः आर्थिक संकटाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम गंभीर असू शकतो. पैसा कमी पडणे ही केवळ आर्थिक समस्या राहत नाही; त्यासोबत कुटुंबाची जबाबदारी, सामाजिक प्रतिष्ठा, भविष्याची चिंता आणि असुरक्षितता जोडली जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिला सामाजिक, आर्थिक आणि भावनिक आधार देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याचे आव्हान मोठे आहे. अनेक ठिकाणी मानसिक त्रासाला आजार न मानता स्वभावाचा दोष मानला जातो. मानसिक आरोग्यतज्ज्ञांकडे जाणे म्हणजे समाजात आपली प्रतिमा खराब होईल, अशी भीती काही व्यक्तींना वाटू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्यसेवा गावपातळीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक जनजागृती केली पाहिजे. मानसिक आरोग्य हा केवळ मोठ्या शहरातील विषय नसून ग्रामीण समाजाचाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. आत्महत्या प्रतिबंधात माध्यमांची जबाबदारी अत्यंत मोठी आहे. एखाद्या आत्महत्येच्या घटनेचे वृत्तांकन करताना सनसनाटी मथळे, अनावश्यक तपशील, व्यक्तीला दोष देणारी भाषा किंवा घटनेचे उदात्तीकरण टाळले पाहिजे. संवेदनशील वृत्तांकन समाजाला प्रतिबंधात्मक माहिती देऊ शकते. बातमीसोबत मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन, मदत मिळण्याची साधने आणि गरजूंनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असा संदेश दिल्यास माध्यमे समाजाच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका बजावू शकतात. वृत्तपत्रे आणि माध्यमे केवळ घटना सांगणारी साधने नसून सामाजिक विचार घडविणारी प्रभावी माध्यमे आहेत. त्यामुळे या विषयाकडे मानवी संवेदना आणि सामाजिक जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. शासन आणि आरोग्यव्यवस्थेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मानसिक आरोग्याच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि सन्मानपूर्वक उपलब्ध झाल्या पाहिजेत. मानसिक आरोग्यतज्ज्ञांची उपलब्धता वाढविणे, प्राथमिक आरोग्यव्यवस्थेशी मानसिक आरोग्यसेवा जोडणे, शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि संकटातील व्यक्तींना योग्य मदत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

आत्महत्या प्रतिबंधासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका ओळखली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती मानसिक आरोग्यतज्ज्ञ असणे आवश्यक नाही; परंतु प्रत्येकजण संवेदनशील माणूस होऊ शकतो. आपल्या मित्राच्या वर्तनात अचानक बदल जाणवला तर त्याच्याशी संवाद साधता येतो. एखादा सहकारी सतत तणावाखाली दिसत असेल तर त्याची विचारपूस करता येते. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती एकाकी होत असेल तर तिच्यासोबत वेळ घालवता येतो. विद्यार्थी चिंताग्रस्त दिसत असेल तर त्याच्यावर केवळ अभ्यासाचे दडपण न आणता त्याच्या मनाची अवस्था जाणून घेता येते. संकटातील व्यक्तीला तिच्या समस्यांचे सर्व उत्तर आपल्याकडे नसले तरी योग्य मदत मिळवून देण्यासाठी आपण दुवा बनू शकतो. हीच सामाजिक संवेदनशीलतेची खरी परीक्षा आहे. समाजात मदत मागणे म्हणजे कमजोरी हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीत मदत मागण्याचे धैर्य हे कमजोरीचे नव्हे, तर आत्मजाणीवेचे लक्षण आहे. आपल्या मनावरचा ताण ओळखणे, तो विश्वासू व्यक्तीसमोर व्यक्त करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ मदत घेणे ही आरोग्यदायी कृती आहे. मानसिक आरोग्याविषयी बोलताना लाज वाटू नये. जसे ताप आला की आपण उपचार घेतो, तसे मन अस्वस्थ झाल्यावरही मदत घेणे स्वाभाविक मानले पाहिजे. समाजाने मानसिक आरोग्याची चर्चा सामान्य केली तर अनेक व्यक्तींना योग्य वेळी मदत मिळण्याची शक्यता वाढेल. आत्महत्या प्रतिबंधाचा व्यापक अर्थ संकटाच्या अंतिम टप्प्यावर हस्तक्षेप करणे एवढाच नाही. जीवनात अर्थपूर्ण नाती निर्माण करणे, व्यक्तीला सामाजिक स्वीकार मिळवून देणे, भेदभाव कमी करणे, रोजगार आणि सामाजिक सुरक्षिततेच्या संधी वाढविणे, शिक्षणात मानवी मूल्यांना स्थान देणे आणि आरोग्यसेवा सर्वांसाठी सुलभ करणे हा त्याचा मोठा भाग आहे. मानसिक आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा जवळचा संबंध आहे. ज्या समाजात व्यक्तीला आपले दुःख व्यक्त करण्याची मोकळीक असते, अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याची संधी मिळते आणि संकटात मदतीचा हात पुढे होतो, तो समाज मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम असतो.

सप्टेंबरचा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आपल्याला म्हणूनच एक महत्त्वाचा सामाजिक संदेश देतो. संकटातील व्यक्तीला तिच्या परिस्थितीसाठी दोष देऊ नका; तिचे म्हणणे ऐका. तिच्या वेदनेची तुलना इतरांच्या वेदनांशी करू नका; तिच्या अनुभवाचा आदर करा. ती मदत मागत असेल तर तिला दुर्लक्षित करू नका; योग्य मदतीपर्यंत पोहोचवा. तिच्या आयुष्यातील एका कठीण प्रसंगाला तिच्या संपूर्ण जीवनाचे अंतिम सत्य मानू नका. परिस्थिती बदलू शकते, योग्य मदत मिळू शकते आणि जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणून संकटातील व्यक्तीला वेळ, आधार, उपचार आणि आशा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या दिवशी आपण आपल्या घरापासून सुरुवात करूया. मुलांशी फक्त त्यांच्या गुणांबद्दल बोलू नका; त्यांच्या भावनांबद्दलही विचारा. तरुणांच्या अडचणींना हट्ट किंवा अपरिपक्वता म्हणून नाकारू नका. वृद्धांच्या शांततेमागे एकाकीपणा आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. मित्राच्या हसऱ्या चेहऱ्यामागे काही वेदना आहेत का, याची विचारपूस करा. कार्यस्थळी सहकाऱ्यांशी मानवी नात्याने वागा. मानसिक आरोग्याविषयी चर्चा करण्यास सुरक्षित वातावरण निर्माण करा. कारण आत्महत्या प्रतिबंधाची सुरुवात कोणत्याही मोठ्या योजनेतून नव्हे, तर आपल्या दैनंदिन वर्तनातील संवेदनशील बदलातून होते. मानवी जीवन हे कोणत्याही एका परीक्षेच्या निकालापेक्षा, कोणत्याही एका नात्यापेक्षा, कोणत्याही एका आर्थिक संकटापेक्षा किंवा कोणत्याही एका अपयशापेक्षा मोठे आहे. आयुष्याच्या वाटेवर संकटे येतात, परंतु संकट म्हणजे जीवनाचा शेवट नव्हे. माणसाला पुन्हा उभे राहण्यासाठी कधी कधी केवळ एक विश्वासू व्यक्ती, काही क्षणांचा मनापासून संवाद आणि योग्य मदतीचा मार्ग आवश्यक असतो. म्हणून समाजाने अशी संस्कृती निर्माण केली पाहिजे की जिथे प्रत्येक व्यक्तीला माझे दुःख कोणीतरी ऐकेल, माझ्या अडचणीची थट्टा केली जाणार नाही आणि गरज पडल्यास मला मदत मिळेल असा विश्वास वाटेल.जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन हा केवळ एका दिवसाचा उपक्रम ठरू नये. मानसिक आरोग्याविषयीचा संवाद वर्षभर सुरू राहिला पाहिजे. शाळा, महाविद्यालये, कुटुंबे, कार्यस्थळे, आरोग्यसंस्था, माध्यमे आणि समाजसंस्था यांनी एकत्रितपणे संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला सन्मान मिळाला पाहिजे. दुःख व्यक्त करण्याला कमजोरी समजले जाऊ नये आणि मदत मागण्याला लाजेची बाब मानले जाऊ नये. समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप केवळ आर्थिक विकासात नसून संकटात असलेल्या आपल्या माणसांच्या पाठीशी आपण किती ठामपणे उभे राहतो यात आहे.

आजच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आपण एक सामूहिक संकल्प करूया, मौनाऐवजी संवादाची निवड करूया, उपेक्षेऐवजी आपुलकीची निवड करूया, दोषारोपाऐवजी समजूतदारपणाची निवड करूया आणि निराशेऐवजी आशेचा संदेश देऊया. आपल्या आसपासच्या व्यक्तीच्या मनातील वेदना आपण पूर्णपणे समजू शकू असे नाही; परंतु ती वेदना ऐकण्याची तयारी आपण नक्की दाखवू शकतो. प्रत्येक संकटग्रस्त व्यक्तीला योग्य वेळी योग्य आधार मिळावा यासाठी आपण दुवा बनू शकतो. एका प्रश्नातून संवाद सुरू होऊ शकतो, संवादातून विश्वास निर्माण होऊ शकतो, विश्वासातून मदतीचा मार्ग खुला होऊ शकतो आणि त्या मदतीतून जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणूनच आजचा संदेश स्पष्ट आहे की एक संवाद साधूया, एक आधार देऊया, मौनाची भिंत तोडूया आणि प्रत्येक जीवनाला जगण्याची नवी आशा देऊया; कारण प्रत्येक जीवन अमूल्य आहे आणि प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# गुरुद्वारा मार्गावरील अतिक्रमणावर कारवाई! ;दसरा सण अतिक्रमणमुक्त असावा

**रविन्द्रसिंघ मोदी**

नांदेड:देश-विदेशात सुप्रसिद्ध असलेल्या तख्त सचखंड गुरुद्वाराकडे जाणाऱ्या मुख्य मार्ग आणि भोवतालच्या भागातील अतिक्रमणावर बुधवारी नांदेड महानगर पालिका आयुक्त डॉ.महेश डोईफोडे यांच्या आदेशानुसार सहायक आयुक्त स. अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वात जवळपास शंभर अतिक्रमणं काढून कारवाई करण्यात आली. ज्यामुळे गुरुद्वारा मुख्य मार्ग, गेट नंबर एक ठिकाणच्या फूटपाथावरील भाविकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता मोकळा झाला आहे. मागील अनेक दिवसांपासून रस्ता आणि फूटपाथवरील




अतिक्रमणावर तक्रारी येत होत्या. तर रस्त्यावरील अतिक्रमणाचा विषय उच्च न्यायालय पर्यंत पोहचला आहे. म्हणून महानगर पालिका पथकाने केलेली कारवाई सध्या चर्चेत आहे.

बुधवार, दि.९ सप्टेंबर रोजी महानगरपालिकेच्या पथकाने जेसीबी मशीनाचा वापर करत गुरुद्वारा मार्गावरील अतिक्रमणावर कारवाई केली. यावेळी मदतीला पोलीस पथकही होते. सुमारे शंभर अतिक्रमण काढतांना काही जणांच्या रोषाचाही सामना या पथकाला करावा लागला. गुरुद्वारा मुख्य मार्ग आणि गेट नंबर एक समोरील परिसरातील दुकानदारांनी दुकानासमोर व फूटपाथावर दहा ते वीस फूट अतिक्रमण करुन आपली दुकाने थाटल्याचे प्रकार अतिक्रमण पथकास निदर्शनास आले. अगदी गेट नंबर एक समोर देखील स्टॉल लावल्याचे चित्र होते. फेरीवाले, फळ विक्रेत्यांनी देखील जागा व्यापल्याचे चित्र पथकासमोर निदर्शनास आले होते. बाहेरून आलेल्या भाविकांना चालण्यासाठी रस्ता आणि फूटपाथ उपलब्ध नसल्याचे दिसून आले. रस्त्यावर हात गाड्यांची संख्या व खासगी वाहनांच्या अस्ताव्यस्त पार्किंगमुळे देखील असंख्य समस्या उद्भवत होत्या. आता अतिक्रमणे काढल्यामुळे काही काळ भाविकांना सुविधा मिळणार आहे. पण काही दिवसांत अतिक्रमणे 'जैसे थे' होणार असे नागरिक म्हणत आहेत. तर फूटपाथावर गाडे लावून काही खासगी लोकं किराया कमावत असल्याचेही बोलले जात आहे. रस्त्यावर हॉटेल, ज्यूस सेंटर सुरु आहेत. ज्यामुळे पायी चलतांना देखील अडचन होते. भाविकांमध्ये वृद्ध व्यक्ती, महिला व लहान मुलांचाही समावेश असतो. म्हणून नांदेड महानगर पालिकेच्या अतिक्रमण पथकाने केलेली कारवाई रास्तच वाटते.

**दसरा सण अतिक्रमणमुक्त असावा**

येत्या महीनाभरानंतर गुरुद्वाराचा एक मुख्य सण दशहरा हल्ला महल्ला साजरा होणार आहे. दसरा सण साजरा करण्यासाठी जवळपास एक लाख भाविक गुरुद्वाराच्या दर्शनासाठी पोहचतात. त्यावेळी मोठी वर्दळ वाढते. वाहनांची संख्या देखील वाढते. गुरुद्वारा बोर्डाकडे पार्किंगची योग्य व्यवस्था उपलब्ध नसल्याने असंख्य वाहनांना रस्त्यावरच पार्किंगची जागा शोधावी लागते. पण त्यावेळी अतिक्रमणामुळे भाविकांच्या वाहनांना जागा मिळत नाही. रस्त्यावर हातगाडे, ठेले आणि स्टॉल लावल्याने मोठी अडचण निर्माण होत असते. त्यावेळी महानगर पालिका प्रशासन किंवा पोलीस विभाग भाविकांची मदत करण्यासाठी येत नाहीत. एका मोठ्या सणात भाविकांची मोठी गैरसोय होत असते. गुरुद्वारा गेट नंबर एक पासून दसरा हल्ला महल्ला मिरवणूक काढण्यात येते. वरील मिरवणूक गुरुद्वारा मुख्य मार्ग, गुरुद्वारा चौरस्ता, महावीर चौक, हल्लाबोल चौक, चिखलवाडी मार्गे हिंगोलीगेट आणि बाफना मार्गे जाते. गुरुद्वारा गेट नंबर एक पासून चिखलवाडी पर्यंत रस्त्यावर मोठे अडथळे असतात. त्यामुळे समस्या निर्माण होतात. म्हणून दसरा सण अतिक्रमणमुक्त असावा असे अनेकांचे म्हणणे आहे.

## उमरखेडमध्ये १२ सप्टेंबरला थरांचा थरार; साडेपाच लाखांची मानाची दहीहंडी

उमरखेड/प्रतिनिधी-शहराच्या सांस्कृतिक परंपरेत मानाचा तुरा रोवणाऱ्या सिद्धेश्वर मित्र मंडळाच्या वतीने यंदा भव्य मानाची दहीहंडी चे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकासाठी तब्बल पाच लाख ५५ हजार ५५५ रुपये आणि सन्मानपत्र असे विक्रमी बक्षीस ठेवण्यात आले आहे.

शनिवार, १२ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते रात्री १० वाजेपर्यंत पुसद रोडवरील महाराष्ट्र बँक परिसरात हा भव्य महोत्सव जल्लोषात पार पडणार आहे. या महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी घेण्यात आलेल्या नियोजन बैठकीत लोकनेते माजी आमदार उत्तमराव इंगळे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शिस्त, सुरक्षा आणि नियोजनावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. कार्यक्रमाला प.पू. धर्मगुरू श्री बाबुसिंग महाराज, प.पू. सद्गुरू शिरोमणी गोवत्स श्री वालयोगी व्यंकट स्वामीजी महाराज आणि प.पू. प्रा. १०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज महादेव मठ संस्थान, हदगाव यांचे विशेष आशीर्वाद लाभणार आहेत. प्रमुख पाहुण्या मा. खासदार नवनीत राणा आणि प्रसिद्ध वक्त्या हर्षा ठाकुर उपस्थित राहणार असून पालकमंत्री संजय राठोड, खा. नागेश पाटील आष्टीकर, माजी आ. मदन येरावार, आ. किसनराव वानखेडे, नगराध्यक्षा सौ.तेजस्विनी संतोष जैन, सौ.मोहिनी इंद्रनील नाईक,माजी आ. प्रकाश पाटील देवसरकर, माजी आ. राजेंद्र नजरधने, माजी आ. नामदेव ससाने, माजी आ. विजय खडसे, राम देवसरकर, डॉ.अंकुश देवसरकर, मा. आनंदराव जाधव यांच्यासह शहरातील सर्व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी सिद्धेश्वर मित्र मंडळाचे जस्विन घनघाव, अनिल ठाकरे, संदिप किन्हाळकर, अक्षय वानखेडे, करण रुडे, आदित्य शिंदे, शुभम काळे यांच्यासह सल्लागार व नियोजन समितीचे सर्व पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

## देगलूर महाविद्यालयातील डॉ.नरवाडे यांना एम.आर.पी.मंजूर

देगलूर/प्रतिनिधी-अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. केशव बापूराव नरवाडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडून नांदेड जिल्ह्यातील काही जंगली भाज्यांची विविधता या विषयासाठी लघु शोध प्रकल्प (लघु अनुसंधान परियोजना) मंजूर झाला आहे.

या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, रवींद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ.एम.एम.चमकुडे उपप्राचार्य डॉ.व्ही.जी.शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, प्रसिद्धीप्रमुख डॉ.बी.आर. कत्तुरवार, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा.अश्विनी बोडके, प्रा.मंजुषा आलुरे, प्रा.विशाखा नाईक, प्रा.तरनूम बेगम, प्रा.जवेरिया फातेमा, प्रा. साक्षी पेरगुलवार, प्रा.पल्लवी बोईनवाड,तिरुपती उरलागोंडावार आणि सर्व विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

## सिंदखेड पोलिसांच्या कारवाईत अवैध देशी दारुसह एक लाखांचा मुद्देमाल जप्त

माहूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत सिंदखेड पोलिसांनी अवैध देशी दारू वाहतुकीवर कारवाई केली. या कारवाईत १ हजार बाटल्या देशी दारूसह दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्कुटी असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चिंचखेड येथून रामपूरच्या दिशेने दि.९ सप्टेंबर रोजी एका स्कुटीवरून अवैध देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार रामपूर-पेणगंगा नदी पुलाजवळ पोलिसांनी सापळा रचला. यावेळी एमएच-२९-बीटी-३१३१ क्रमांकाच्या स्कुटीची तपासणी केली असता त्यामध्ये अवैध देशी दारूच्या १ हजार बाटल्या आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या दारूची अंदाजे किंमत ४० हजार रुपये, तर दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या स्कुटीची किंमत अंदाजे ६२ हजार रुपये आहे. असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.या प्रकरणी कृष्णा प्रल्हाद बोरे (वय २२), दुर्गेश विजय दुतकर (वय २१) तसेच यवतमाळ जिल्ह्यातील एका संशयिताविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. आरोपींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना देशी दारूची वाहतूक केल्याचे निष्पन्न झाल्याने सिंदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे पोलीस अंमलदार पोना कोडापलकुलवार, पोको इंगळे तसेच चालक होमगार्ड राठोड यांचा सहभाग होता.

## लोककलेचा वारसा जपणाऱ्या भालेराव धडांजेंना राज्य सांस्कृतिक पुरस्कार

किनवट/प्रतिनिधी-वाद्य निर्मितीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन तसेच संवर्धन करणारे बुधवारपेठ येथील वृद्ध कलावंत भालेराव नागोराव धडांजे यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२५ आज (९ सप्टेंबर) प्रदान केलाय. वाद्य निर्मिती या कलाक्षेत्रात धडांजेंनी प्रदीर्घ काळ केलेल्या विशेष योगदानाबद्दल आ.भीमराव केराम यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.



सहाय्यक जिल्हाधिकारी बी.सरवनन, तहसीलदार डॉ. शारदा चौडेकर, गटविकास अधिकारी डी.टाकरस, अभिजित जगताप. सुनील व्यावहारे, वसंतराव कुडमते, आनंद मच्छेवार, बालाजी बामणे, संतोष मरस्कोल्हे, संतोष अडकिने, अक्रम भाई, दीपक कुडमते, मोहन धडांजे आणि जंगू मडावी आदि मान्यवरांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी केले. या सोहळ्याला परिसरातील ग्रामस्थ, नागरिक आणि कलाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोककलेचा वारसा जपणाऱ्या भालेराव धडांजे यांच्या या यशामुळे किनवट तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## राष्ट्रीय लोकअदालत १२ सप्टेंबर रोजी

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेडचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार, दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळ आणि पैशाचे महत्त्व लक्षात घेता, लोकअदालत ही प्रकरणे परस्पर संमतीने निकाली काढण्याची प्रभावी संधी आहे. न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असलेल्या पक्षकारांनी आपसात तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा वेळ व खर्च वाचण्यास मदत होणार आहे. तसेच वाद दोन्ही पक्षांच्या संमतीने मिटल्यामुळे परस्पर हितसंबंध व सौहार्दाचे संबंध कायम राखण्यासही मदत होईल.



### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **समीरखान शमशीरखान** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५५८/५A, गट क्र.५५८ प्लॉट क्र.५A** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शेख जलील पि.शेख शामद** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ११९१/२०२६ दि.१४.८.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- तरोडेकर यांची जागा, पश्चिमेस :- २० फुट रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.४-B, दक्षिणेस :- प्लॉट क्र.५-B

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सरवर खान पि.नजीर खान पठाण** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५५८/१४B, गट क्र.५५८ प्लॉट क्र.१४B** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शेख जलील पि.शेख शामद** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ११८८/२०२६ दि.१४.८.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील माहीनबाग नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २० फुट रस्ता, पश्चिमेस :- स.युसुफ स.बिस्मिला यांचा प्लॉट, उत्तरेस :- प्लॉट क्र.१५A, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१४-A

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७१/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शाहेदा बेगम मोबीन पिंजारी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८५/१६-१-बी गट क्र.५५८ प्लॉट क्र.१५** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **निलोफर बेगम अब्दुल रशिदखान** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २११३/२०२६ दि.२८.७.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- उमरशरीफ नुरअली यांचा प्लॉट आहे, पश्चिमेस :- २० फूट रुंद रोड आहे, उत्तरेस :- प्लॉट क्र.१६ आहे, दक्षिणेस :- रस्ता आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७२/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **दैवशाला कृष्णा लंगडे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७२/१९ गट क्र.५१२ प्लॉट क्र.१९** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **रघुनाथ रामकिशन कऱ्हाळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १२५५/२०२६ दि.२.०९.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.२०, पश्चिमेस :- सदरील गटाचा मोकळी भाग आहे, उत्तरेस :- २० फूट रस्ता, दक्षिणेस :- सदरील गटाचा मोकळा भाग

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **विष्णु पि.दामोधर जडे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७९/१५५, १४६ गट क्र.१७९ प्लॉट क्र.१५५,१४६** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री स्वामी समर्थ इस्टेटसचे भागीदार १) जितेंद्र प्रकाशचंद जेठाणी व इतर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १८/२०२५ दि.३.१.२०२५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९.०० मी.रुंद रोड आहे, पश्चिमेस :- ९.०० मी.रुंद रोड आहे, उत्तरेस :- १२.०० मी.रुंद रोड आहे, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१४५ व १५६ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१२७४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.८/९/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शौकत अली सय्यद बाखर अली** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८५/४१-A, गट क्र.५६५ प्लॉट क्र.१८** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **नरुलहख पि.ऐनुला हख अन्सारी** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २२९/२०२६ दि.६.२.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.२० आवेजखान आरेफखान, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१६ शेख मुजाहेद शेख हुसेन, उत्तरेस :- २० फुट रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१७

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# दहा हजार द्या,घरकुलाचे बिल घ्या!



## किनवट पं.स.वर लाभार्थ्याकडून लाचखोरीचा आरोप

किनवट/प्रतिनिधी-केंद्र आणि राज्य सरकारद्वारा संयुक्त ६०-४० भागीदारीतून कार्यान्वित केलेल्या प्रधानमंत्री आवास अर्थात सर्वांना घरकुल या लोककल्याणकारी योजनेला किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमत वाघमारे यांच्या साक्षीने लाच दिल्याशिवाय देयके दिल्या जात नाहीत हे बोधडी खुर्द येथील लाभार्थ्यांच्या तक्रारीवरून स्पष्ट झाले आहे. जवळपास १९ हजार लाभार्थ्यांच्या घरकुलापैकी प्रत्यक्षात किती घरकुल पूर्ण-अपूर्ण, किती प्रगतीपथावर आणि निधी उचल करून कामच केले नाही ? याच्या मुल्यांकनासाठी विभागीय स्तरावरुन 'विशेष बाब' या सदराखाली चौकशी करून यंत्रणेतील दोषी लाचारांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

किनवट पंचायत समितीचा अभियंता हर्षद तेलंग यांच्याविरुद्ध लाचखोरीच्या मुद्द्यावरुन बोधडी खुर्द येथील घरकुल लाभार्थी आक्रमक झाले आहेत. घरकुलाच्या बिलापोटी दहा दहा हजार रुपयांची बेडरपणे मागणी केली जाते. लाच दिल्याशिवाय टेबलावरच्या कागदाला पायच फुटत नाहीत. दलालांच्याही उद्रेकाला लोकं वैतागलीत. घरकुलाला मिळतातच एक लाख वीस हजार रुपये. त्यात दलालांसहीत तीस हजार रुपयांची लाच घेतल्यास नव्वद हजार रुपयात घरकुल तयार होते का ? असा तक्रारदारांचा सवाल आहे. घरकुल योजना असफल होण्यास पंचायत समितीचे प्रशासनच जबाबदार आहे. अशा लाचार अभियंत्यावर कारवाई झाल्याशिवाय योजना सफल होणार नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. प्रधानमंत्री आवास घरकुल योजना ही सर्वांना घरकुल त्यासाठी केंद्र सरकारचा ६० टक्के आणि राज्य सरकारचा ४० टक्के वाटा आहे. शिवाय एम.आर. इ. जी. एस.मधून १८ तर स्वच्छ भारत मिशनचा १२ हजार रुपये निधीचा वाटा आहे. वेगवेगळ्या योजनांमधून प्रचंड प्रमाणात घरकुलनिधी किनवट तालुक्याकडे ओळता केलाय. परंतु उच्च स्तरीय चौकशी समिती मार्फत गावनिहाय लाभार्थ्यांची चौकशी केल्यास घबाड बाहेर पडेल. असे नागरीकांचे म्हणणे आहे. निवेदनावर राजेंद्र शेळके, मारोती गायकवाड, कांता दराडे, श्याम बेरडवार, शिवराज मुंडे, यादव धनवे, जीवा गादेकर, सुनील पाईकराव, बालाजी गायकवाड, चंद्रकांत वाघमारे, बालाजी तलांडे, संतोष टाळंमवाड, गजानन गेडाम व खंडू दराडे आदींच्या सह्या आहेत.

# मराठा विद्यार्थ्यांना एसईबीसी आरक्षणाचा मोठा लाभ;विखे पाटलांचा दावा

मुंबई/प्रतिनिधी-मराठा समाजाला देण्यात आलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (एसईबीसी) प्रवर्गातील १० टक्के आरक्षणाचा मराठा विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत असल्याचा दावा मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला. एसईबीसी आरक्षणाला न्यायालयीन स्थगिती मिळू नये, यासाठी सरकार विशेष लक्ष देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एसईबीसी आरक्षणाचा समाजातील विद्यार्थ्यांना लाभ मिळत नाही, अशी परिस्थिती नसून या आरक्षणाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. आगामी काळातही या आरक्षणाचा अधिकाधिक लाभ मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मिळेल, असे विखे पाटील यांनी सांगितले.दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत मराठा मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका स्पष्ट करताना विखे पाटील म्हणाले की, मराठा समाजाच्या मागण्यांकडे सरकार गांभीर्याने पाहत आहे. या प्रकरणात संबंधित सहकारी लक्ष घालत असून त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आंदोलनाची भूमिका कायम ठेवणाऱ्या जरांगे पाटील यांच्या घोषणेमुळे सरकारसमोर पुन्हा एकदा आव्हान उभे राहिले आहे. मात्र, मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून उपलब्ध कायदेशीर व प्रशासकीय मार्गांचा विचार करून पुढील कार्यवाही केली जाईल, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

# ग्रामीण भागातील इंग्रजी शाळांकडून पालकांच्या आर्थिक लुटीची चौकशी करा-आ.राजेश पवार

नायगाव/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील काही खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून सीबीएसईच्या नावाखाली पालकांकडून विविध प्रकारचे अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. या पार्श्वभूमीवर नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश पवार यांनी नायगाव, उमरी व धर्माबाद तालुक्यातील संबंधित शाळांची तातडीने तपासणी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केली आहे.



प्रवेश शुल्क, वार्षिक शुल्क, टर्म शुल्क, विकास शुल्क, ॲक्टिव्हिटी शुल्क, क्रीडा, संगणक, प्रयोगशाळा, परीक्षा, ग्रंथालय, पिकनिक, सांस्कृतिक कार्यक्रम, ओळखपत्र, डायरी, वाहतूक आदी विविध कारणांसाठी पालकांकडून शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. शिक्षणाच्या नावाखाली पालकांच्या खिशावर भार टाकणाऱ्या या मनमानीला वेळीच लगाम घालण्याची गरज आहे. संबंधित शाळांची मान्यता, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, शिक्षकांना दिले जाणारे वेतन, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि शुल्क आकारणीचे नियम यांची सखोल तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित शाळांवर कठोर कारवाई करावी आणि पालकांची आर्थिक पिळवणूक थांबवावी, अशी ठाम मागणी आ. राजेश पवार यांनी केली आहे. या मागणीमुळे पालक वर्गामध्ये आनंदी वातावरण आहे तर इंग्रजी शाळां चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शेतकरी-शेतमजुरांच्या मागण्यांसाठी उद्या काँग्रेसचा मोर्चा

## काँग्रेसचे माजी आ.माधवराव पा.जवळगांवकर सक्रीय झाले...!

हदगांव/प्रतिनिधी-शेतकरी व शेतमजुरांच्या विविध ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि.११ सप्टेंबर रोजी हदगाव शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हदगाव विधानसभा क्षेत्राचे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मोर्चा काढण्यात येणार असून आता माजी आमदार हे या निमित्ताने सक्रीय झाल्याचे दिसून येत आहे.

शेतकरी व शेतमजुरांच्या न्याय्य हक्कांसाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार या आंदोलनातून व्यक्त केला जाणार आहे. हदगाव शहरातील राष्ट्रीय क्लब येथे मोर्चासाठी जमावाचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. काँग्रेसने शासनासमोर दहा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. मागील तीन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे निर्माण झालेला कोरडा दुष्काळ जाहिर करावा, शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, सरसकट कर्जमाफी करावी, शेतपंपांना दिवसभर वीजपुरवठा करावा, मजुरांच्या हाताला रोजगार द्यावा आणि शेतकऱ्यांना तात्काळ पीकविमा मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच मजुरांना रेशन उपलब्ध करून देणे, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करणे, शक्तिपीठ महामार्ग तात्काळ रद्द करणे तसेच ई-पिक पाहणीचे सध्याचे निकष बदलून पूर्वीप्रमाणे करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा काँग्रेसकडून देण्यात आला आहे. त्यामुळे ११ सप्टेंबरचा हदगाव शहरातीलकाँग्रेसचा मोर्चा शासनाच्या शेतकरी धोरणा विरोधातील शक्तिप्रदर्शन ठरणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

बऱ्याच कालावधीनंतर काँग्रेसचे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर या मोर्चाच्या निमित्ताने सक्रिय झाल्याचे दिसून येत असून यापूर्वी राजकीय दृष्ट्या ते अन्य कोणत्या तरी प्रमुख पक्षात जाणार आहेत अशा चर्चेला उधाण आले होते पण त्यांनी या बाबतीत मात्र स्थानिक माध्यमा समोर उघडपणे येऊन आपली भूमिका मांडली नव्हती या मुळे त्यांच्या विषयी कार्यकर्त्यांमध्ये 'गुढ'' वाढले होते विशेष म्हणजे 'त्यांचे स्थानिक नागरिक व काही माध्यम सोडले सोडले तर इतर माध्यम पासून ते काही वर्षा पासून ते दुरच होते हे आवर्जून उल्लेख करावा लागेल आणखी विशेष म्हणजे त्यांचे ते वाक्य मात्र चर्चेत होत माजी मुख्यमंत्री व सध्याचे भाजपाचे खा.अशोक चव्हाण यांच्या सोबत गेलो असतो तर मी 'आमदार'झालो असतो हे वाक्य ही पण त्यांचे फार चर्चिल्या गेले होते याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

# गणेशोत्सव शांततेत साजरा करा;प्रशासनाचे आवाहन

## शांतता समितीच्या बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा

माहूर/प्रतिनिधी-आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलीस ठाण्याच्या वतीने ९ सप्टेंबर रोजी बालाजी मंगलम येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच सामाजिक सलोखा कायम ठेवत उत्सव साजरा करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

बैठकीस उवविभागीय पोलीस अधीकारी किरण भोंडवेनिवासी नायब तहसीलदार अरुणा सूर्यवंशी, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, उपनगराध्यक्ष नाना लाड, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता प्रीतम वसमतकर, नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक गजलवाड, नगर अभियंता विशाल ढोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.माहूर शहर व ग्रामीण भागातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील तसेच वंसंत कपाटे, नंदकुमार जोशी, विजय आमले, जयकुमार अडकीने, मनोज कीर्तने, राज ठाकूर, अनिल माडपेलीवार, विकास कपाटे, विनोद सूर्यवंशी, पद्मा गि-हे, सुरेखा तळणकर यांच्यासह मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी मिरवणूक मार्गावरील अडथळे, विद्युत व्यवस्था, विसर्जनस्थळी आवश्यक सुविधा तसेच डीजे वापरण्याच्या परवानगीसंदर्भातील अडचणी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. यावर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी मिरवणूक मार्गावरील अडथळे दूर करणे, विद्युत व्यवस्था सुरळीत ठेवणे आणि विसर्जनस्थळी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण टाळून पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे. उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मंडळांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले.

## माधुरी हत्तीण नांदणी मठात परतणार!

कोल्हापूर:कोल्हापूरकरांसाठी आणि विशेषतः नांदणी मठाच्या भक्तांसाठी अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या काही काळापासून उपचार आणि देखभालीसाठी जामनगर येथील 'वनतारा' प्रकल्पात असलेल्या 'माधुरी' हत्तीणीचा कोल्हापुरात परतण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. उच्चस्तरीय समितीने माधुरी हत्तीणीला पुन्हा नांदणी मठात पाठवण्यास अधिकृत परवानगी दिली आहे. नांदणी मठाच्या माधुरी हत्तीणीची प्रकृती आणि तिच्या देखभालीचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर, न्यायालयाच्या निर्देशानुसार तिला गुजरातमधील 'वनतारा' या प्राणी कल्याण केंद्रात उपचारासाठी पाठवण्यात आले होते.



पारडी तालुका लोहा येथे बैलपोळा उत्साह साजरा करण्यात आला. यावेळी पोळ्याचे मानकरी आता तंटामुक्ती अध्यक्ष माधव पाटील पवार यांनी महादेवाचे अभिषेक करून नारळ फोडले व आपल्या बैलांची महादेव मंदिरांना अर्ध प्रदक्षिणा घालून बैल पळ्यास सुरुवात केली.

# पीपल्स कॉलेजमध्ये 'संवाद लेखक से'या उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन



नांदेड/प्रतिनिधी-सप्टेंबर रोजी नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेज, नांदेड येथील स्नातकोत्तर हिंदी विभाग एवं अनुसंधान केंद्राच्या वतीने 'संवाद लेखक से' या विशिष्ट उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची ही सातवी कडी असून साहित्यिक, लेखक आणि विद्यार्थ्यांमध्ये थेट संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

साहित्य सृजन प्रक्रिया कशी असते? साहित्यकार भाव, बुद्धी, कल्पना आणि शैली या साहित्यिक तत्त्वाच्या आधारे आपली विशेष प्रतिभा शक्ती मानवी भावनेच्या रूपातून साहित्य कृतीमध्ये सर्जनाच्या रूपातून कशा पध्दतीने सादर करीत असतो. म्हणून लेखकांशी थेट संवाद व्हावा यासाठी अर्जापूर येथील नवोदित साहित्यकार डॉ. जे. देविदास यांनी आमच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या साहित्यिक व वैचारिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना जाणून घेण्याची संधी मिळाली. साहित्यनिर्मितीची प्रक्रिया, लेखनाचे विविध पैलू, साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध तसेच लेखक म्हणून आलेले अनुभव यावर या संवादातून विचारमंथन झाले.त्याने विविध सामाजिक भान असलेल्या कविता सादर करून सभागृहाचे ध्यान आकर्षित केले. प्रेम, विरह आणि समाजातील विविध विसंगतीवर व्यंगात्मक कविता सादर केल्या. म्हणजेच संवाद लेखक से.. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट प्रतिसादात पूर्ण झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कॉलेज चे प्राचार्य डॉ. विकास सुकळे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांनी सुद्धा विविध कवींच्या कवितांचा आधार घेत सभागृह जिवंत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभागाध्यक्ष डॉ. भगवान जाधव यांनी केले. डॉ. मुकुंद कवडे यांची उपस्थिती लक्षणीय होती. याबरोबरच हिंदी विभागातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. वर्षा मोरे यांनी केले. शेवटी सर्वांचे डॉ. अर्चना ठोके यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. भीमराव घोडगे, डॉ. वाजिद सर, डॉ. विजया उफाडे, डॉ. स्मिता चालिकवार सर्वांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

पान १ वरुन

## दीड महिन्याचा पावसाचा...

शेतकऱ्यांसमोर आणखी मोठे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पर्जन्यमान, पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यांचे तातडीने सर्वेक्षण करून नांदेड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहिर करावा. तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार तातडीने मदत व आवश्यक सवलती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आ.अमरनाथ राजूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनातून केली आहे. या शिष्टमंडळात महापौर कविता मुळे, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते महेश कनकदंडे, माजी महापौर जयश्री पावडे, ॲड.निलेश पावडे आदींचा समावेश होता.

## नांदेडसह राज्यातील...

नाशिकचा घाट परिसर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. काही भागांत वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाची तूट कायम असल्याने सप्टेंबरच्या उर्वरित कालावधीत होणारा पाऊस खरीप पिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे लक्ष आता पावसाच्या पुढील स्थितीकडे लागले आहे. पावसाची तूट भरून निघाली नाही तर सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची भीती आहे.

## मराठा मोर्चा मुंबईत धडकणारच,...

सरकार जाणूनबुजून हे करणार आहे, असा आरोप त्यांनी केला.गेल्या तीन वर्षांत मी कोणाचीही वाट पाहिली नाही. माझ्या जीवावर आंदोलन करत आलो आहे, असे सांगत जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेण्याची शक्यता फेटाळून लावत, पुढील लढ्याचा निर्धार व्यक्त केला.

## मध्यरात्री रेती तस्करांचा...

गौण खनिज पथकाचे प्रमुख नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या नेतृत्वात ग्राम महसूल अधिकारी ज्ञानेश्वर पेंटेवाड, सुनील वणवे, कोतवाल बंडू चिरंगे, संतोष डाके, विलास शेळके, जनार्दन आढाव व चालक विलास शेडमाके यांनी केली.

## वसरणी येथील कुंटणखान्यावर...

लक्ष्मीबाई संजय जाधव (वय ४८) रा.सुर्यानगर, पावडेवाडी,नांदेड, सचिन कसबे (हॉटेल मालक), अलताफ नबीसाब शेख (वय २४) वडेपुरी, नांदेड, तुषार सुरेश बुध्देवाड (वय ३४) रा.सुनिलनगर, नांदेड यांना अटक करण्यात आली. त्यांच्या जवळून पोलिसांनी २० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात चार जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खा.रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शुक्रवारी काँग्रेसचा जन आक्रोश मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त आयोजित हक्काचे शहर या उपक्रमाअंतर्गत स्थानिक प्रश्नांवर दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्यासह उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या विशेष उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज चौक हडको ते सिडको या दरम्यान हडको सिडकोवाशियांचा जन आक्रोश मोर्चा शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी स.१० वा.आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष तथा आयोजक बापूसाहेब पाटील यांनी दिली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सुचनेनुसार माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त स्थानिक शहरी प्रश्नांवर भाष्य करणारा हक्काचे शहर हा उपक्रम राबविण्यात आला आहे. दरम्यान सिडको हडको परिसरातील मूलभूत सुविधेच्या प्रश्नांसह हडको येथील साई मंगल कार्यालय अद्यावत करून पुन्हा मंगल कार्यालय म्हणूनच सुरू करावे, सिडको आरोग्य केंद्रात नियमित तपासणी व औषधीसह प्रसूतीगृह सुरु करावे, हडको येथे पोलीस चौकी द्यावी, शहर बससेवा सुरु करावी, अत्याधुनिक सभागृह सुरु करावे आदी मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत. दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी यांच्या विशेष उपस्थितीत हा जनआक्रोश मोर्चा होणार आहे. दरम्यान सिडको हडको वाशियांनी शेकडोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्यासह महिला काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष ज्योती कदम, ओबीसी विभाग ब्लॉक अध्यक्ष प्रा. गणेश लिंगमपल्ले, अनुसूचित जाती विभाग ब्लॉक अध्यक्ष एसपी कुंभारे, अल्पसंख्याक अध्यक्ष नुरोद्दीन शेख, सुदाम इंगेवाड आदीसह इतर पदाधिकारी यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४